डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजना
सन २०१८-१९

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र. ०४/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१९.

वाचा :

१) **शासन निर्णय,सा.आ.वि.क्रमांक, कुकका १२०५/प्र.क्र.६०/कु.क.-२,दि.०९.१२.२००५.**

२) **शासन निर्णय,सा.आ.वि.क्रमांक, संकिर्ण २०१७/प्र.क्र.१८४/ आरोग्य-३, दि.२६.०९.२०१७.**

३) **संचालक आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्र.संआसे/कुक.क-१५/टे.३/ न.क्र.आयईसी-७/११४५-४७/२०१८, दि. ०३.१२.२०१८.**

राज्यातील माता व बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे, प्रजनन व बाल आरोग्य विषयी सेवा अधिक प्रभावीपणे देणे, कुटुंब कल्याण उपक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे आणि लोकसहभागातून विविध आरोग्य कार्यक्रम यशस्वी करणे या उद्देशाने राज्यातील उत्कृष्ट कार्य करणारी आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, जिल्हा रुग्णालये व खाजगी संस्था त्याचप्रमाणे डॉक्टरांना वैयक्तिक स्वरुपाचे पुरस्कार देऊन प्रोत्साहन देण्यासाठी संदर्भ अ.क्र.१ येथील शासन निर्णयानुसार शासनामार्फत डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार दिला जात आहे. उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.२ येथील शासन निर्णयान्वये अनुक्रमे सन २०१५-२०१६,सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षासाठी राज्यस्तरीय पुरस्कार योजना व सन २०१७-१८ साठी जिल्हास्तरीय पुरस्कार योजना राज्यात राबविण्याकरीता मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हयात डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजना कार्यक्रम सन २०१७-१८ या वर्षात राबविण्यात आला आहे. परंतु, राज्यस्तरीय पुरस्कार कार्यक्रम या वर्षात झालेला नाही. आता सन २०१८-१९ या

वर्षामध्ये सदर पुरस्कार योजनेसाठी मंजूर अनुदान विचारात घेता सन २०१८-१९ या वर्षासाठीचे केवळ जिल्हास्तरीय पुरस्कार योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर पुरस्कार योजना राबविण्याकरीता योजनेचे निश्चित स्वरुप, आराखडा व अनुदान इत्यादी बाबीबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :

डॉ.आनंदीबाई जोशी जिल्हास्तरीय गौरव पुरस्कार योजना सन २०१८-१९ राज्यात खालीलप्रमाणे राबविण्यास व त्याकरीता रुपये ६०.०० लाख इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	उपक्रम	अपेक्षित खर्च
१	पुरस्कार योजनेचे निकष व नियम याची माहिती देण्याकरीता घडीपत्रिका राज्यस्तरावरुन छपाई	५०,०००.००
२	योजनेच्या माहितीसंबंधीची राज्यस्तरावरुन रेडीओ जिंगल्स निर्मिती/दुरुस्ती (६० सेकंद)	५०,०००.००
३	योजनेची जनजागृतीसाठी राज्यस्तरावरुन आकाशवाणी केंद्रावरुन जिंगल प्रसारण	३,००,०००.००
४	योजनेची जनजागृतीसाठी राज्यस्तरावरुन दुरदर्शनवरुन सरकते संदेशाचे प्रसारण	२,००,०००.००
५	जिल्हास्तरीय पुरस्कार रक्कम/वितरण समारंभ आयोजन सन २०१८-१९ (प्रति जिल्हा रु.१.५० लाख प्रमाणे, प्रति जिल्हा पुरस्कार रक्कम रु.१.३० लाख + रु.२० हजार समारंभ आयोजन)	५१,००,०००.००
६	मोहिमेची व्यापक प्रसिध्दी वृत्तपत्रातून जाहिरात	३,००,०००.००
	एकूण	**६०,००,०००.००**

२. डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजना सन २०१८-१९ साठी पुढीलप्रमाणे पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल.

<u>जिल्हास्तरीय पुरस्कार सन २०१८-१९</u>

(रुपये हजारात)

अ.क्र.	संस्था	प्रथम	द्वितीय	तृतीय
१	आरोग्य उपकेंद्र	रु. १५.००	रु. १०.००	रु. ५.००
२	प्राथमिक आरोग्य केंद्र	रु. २५.००	रु. १५.००	रु. १०.००
३	ग्रामीण रुग्णालय अथवा उपजिल्हा रुग्णालय	रु. ५०.००	--	--

३. डॉ.आनंदीबाई जोशी जिल्हास्तरीय गौरव पुरस्कार सन २०१८-१९ योजनेचे नियोजन व वेळापत्रक उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे यांनी संचालक, आरोग्य सेवा यांच्या सल्ल्याने करावे. पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम डॉ.आनंदीबाई जोशी यांच्या जन्मदिवशी आयोजित करता येईल, याप्रमाणे नियोजन करुन नियोजित वेळापत्रकानुसर कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. तसेच सदर पुरस्कार योजनेची अमलबजावणी संदर्भ क्रमांक-१ येथील शासन निर्णयामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी.

४. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्रमांक- आर-१, मुख्यलेखाशिर्ष "२२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०३- महिला कल्याण, (०१) महिला कल्याण योजना (राज्य योजनांतर्गत योजना), (०१)(०१) डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार (२२३५ ३१८६), ५०- इतर खर्च" यालेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षाकरीता मंजूर असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा

६. सदर रक्कम उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे यांच्या अधिनस्त आहे. त्यांनी आवश्यक कार्यवाही शासनाची विहित पध्दती अनुसरुन करावी.

७. सदर शासन निर्णय, शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग

पहिला, उपविभाग-तीन मधील अ.क्र.४,नियम क्र.२७(२) अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२२१२१००३८३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.02.25 11:45:12 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र १/ २ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, कुटुंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान,मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. उप संचालक, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
६. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
७. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).